# संत तुकाराम वनग्राम योजना अंतर्गत पुरस्कार

- संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रमाच्या माध्यमातून वनसंरक्षण आणि वन संवर्धनाचे कामात ग्रामस्थांचा जास्तीत जास्त सहभाग प्राप्त करणे तसेच संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांमध्ये चूरस निर्माण होऊन समित्यांना जास्तीत जास्त चांगली कामे करण्यास प्रवृत्त करण्याच्या हेतूने, शासन निर्णय महसूल व वनविभाग एफ.डी.एम. २००५/प्र.क्र.३१३/ फ-२, दिनांक २३/११/२००६ अन्वये शासनाने सन २००६-०७ पासून संत तुकाराम वनग्राम पुरस्कार योजना सुरु केली आहे व त्यानुसार संत तुकाराम उत्कृष्ट संयुक्त वन व्यवस्थापन समिती पुरस्कार देण्यात येतो.

- सदर योजने अंतर्गत पुरस्कारासाठी जिल्हा तसेच राज्य पातळीवर उत्कृष्ट संयुक्त वन व्यवस्थापन समित्याची निवड त्यांनी केलेल्या उत्कृष्ट कामाच्या आधारे, १ ते १७ मुद्यांवरील मूल्यांकनाद्वारे करण्यात येते. पुरस्काराकरिता पात्र समितीने एकूण १०० पैकी किमान ५० गुण मिळविणे आवश्यक आहे. वनपरिक्षेत्र स्तरावरील निवड समिती ३ संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांची नावे जिल्हा पुरस्कारासाठी प्रस्तावित करतात, त्यानंतर जिल्हा स्तरावर समित्यांच्या कामाचे मूल्यांकन करुन पुरस्कारासाठी जिल्हा स्तरीय समित्या निर्णय घेतात. जिल्हा स्तरावरील प्रथम पुरस्कार प्राप्त समित्यांचे राज्यस्तरीय पथकाद्वारे फेर मूल्यांकन करुन राज्यस्तरीय प्रथम, द्वितीय व तृतीय पुरस्कार करिता संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांची नावे अंतिम केली जातात. शासन निर्णय महसूल व वनविभाग एफ.डी.एम. २००५/प्र.क्र.३१३/ फ-२, दिनांक १५/२/२००८ अन्वये मराठवाडा प्रशासकीय विभागातून सर्वोत्कृष्ट ठरणा-या एका समितीची विशेष प्रोत्साहनात्मक पुरस्कारासाठी निवड करण्यात येते.

- सदर योजने अंतर्गत खालील प्रमाणे बक्षिसांची रक्कम प्रदान करण्यात येते.
  - जिल्हास्तर - प्रथम पारितोषिक: रुपये ५१,०००/-
    द्वितीय पारितोषिक: रुपये ३१,०००/-
    तृतीय पारितोषिक: रुपये ११,०००/-
  - राज्यस्तर - प्रथम पारितोषिक: रुपये १०,००,०००/-
    द्वितीय पारितोषिक: रुपये ५,००,०००/-
    तृतीय पारितोषिक: रुपये ३,००,०००/-
  - मराठवाडा प्रशासकीय विभागाकरीता: रुपये १,५१,०००/-

# वर्ष निहाय राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त समित्यांची नांव

| वर्ष | प्रथम पुरस्कार गाव / जिल्हा | द्वितीय पुरस्कार गाव / जिल्हा | तृतीय पुरस्कार गाव / जिल्हा | मराठवाडा प्रशासकीय विभागासाठी प्रोत्साहनात्मक बक्षिस |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| २००६-०७ | १) सायगाटा-चंद्रपूर | मिरजेवाडी-पुणे | वडगांव- सांगली | -- |
| | २) हिवरेबाजार- अहमदनगर | | | |
| २००७-०८ | १) रानमळा-पुणे | १) पारेगांव-नाशिक (इंदिरानगर) | कोंढाळा-गडचिरोली | -- |
| | २) ढोरजे- अहमदनगर | २) भुवन- ठाणे | | |
| २००८-०९ | १) दोंद- पुणे | १) खुडुस- सोलापूर | १) वासुंबे- सांगली | लासोना - लातूर |
| | २) लामकाणी- धुळे | २) कोंटी-बुलढाणा | २) दहिवली- ठाणे | |
| २००९-१० | १) शिराळा- लातूर | १) साकुर्डे - पुणे | १) डोणवतवाडी- रायगड | नाटवी- औरंगाबाद |
| | २) गर्दणी- अहमदनगर | २) सातारा भोसले- चंद्रपूर | २) फुटाणा- गोंदिया | |
| | ३) राजवड- जळगाव | ३) कोंढाळा- गडचिरोली | ३) तावशी- भंडारा | |
| | | | ४) नंदाळे - धुळे | |
| | | | ५) कान्हार्ले- ठाणे | |
| | | | ६) बाणुरगड- सांगली | |
| २०१०-११ | १) कोंढाळा- गडचिरोली | १) अकोली- लातुर | १) राळेगण सिंदी - अहमदनगर | नागेवाडी - उस्मानाबाद |
| | | | २) होराळे- रायगड (विभागुन) | |
| २०११-१२ | १) हत्तीबेट (देवर्जन)- लातूर | १) मडेघाट -भंडारा<br>२) खैराट धनगरवाडा (वावर्ले)- रायगड (विभागुन) | १) सातारा भोसले - चंद्रपूर<br>२) आमगांवखडकी- वर्धा<br>३) नांदर्खी-धुळे<br>४) निमखेडी-बुलढाणा (विभागुन) | ३) चौका- औरंगाबाद |